# प्रस्तावना

पर्यावरण किंवा त्याचे संदर्भात चर्चा काहीही नवीन नसुन या बद्दल पहिली पर्यावरण संदर्भात परिषद सन १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झाली. पर्यावरण संदर्भातील अनेक परिषदा झाल्या परंतु त्य परिषदांमध्ये सुचविण्यात आलेल्या सुचनांची अंमलबजावणी अत्यंत हळु करणेत आल्या. प्रत्येक प्रकल्प यशस्वी होण्याकरिता काही कालावधी लागतच असतो. पर्यावरण संदर्भात कामकाजाला खरी गती १९९२ च्या जागतिक वसुंधरा परिषदेनंतरच मिळाली.

सन १९९२ मध्ये ब्राझील रियो डीई जानीरिओ येथे जागतिक वसुंधरा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत जगातील सर्व प्रमुख देशांनी सहभाग घेतला होता. सर्व देशांनी चिरंतन व चिरस्थायी विकास साधण्यासाठी पर्यावरणावर दुष्परिणाम होऊ नये याकरिता २१ व्या शतकासाठी नियोजन करण्याचा प्रस्ताव मंजुर झाला. त्याचे फलस्वरुप कार्यक्रम पत्रिका - २१ तयार करण्यात आली त्यामध्ये पर्यावरण संरक्षण करणेकरिता अनेक बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या मुलभुत समस्यांचे निवारण स्थानिक पातळीवर होण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात वाढ करण्याच्या दृष्टीने सदरचे ७४ व्या भारतीय घटना दुरुस्ती मधील १२ व्या सुचीमधील आर्टिकल २४३ (डब्ल्यु) च्या अनुषंगाने महानगरपालिका व नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात खालील कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याची यादी खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | नियोजन | :- नगररचना |
| २) | जमिनीचा वापर | :- बांधकामे व जमिनीचा वापर याबाबत नियमावली |
| ३) | प्रगती | :- सामाजिक व आर्थिक उन्नती / प्रगती |
| ४) | अंतर्गत व्यवस्था | :- रस्ते व पुल |
| ५) | पाणी | :- घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक पाण्याचा वापर |
| ६) | आपत्कालिन सेवा | :- अग्निशामक दल |
| ७) | आरोग्य | :- सामाजिक आरोग्य, परिसर स्वच्छता व घनकचऱ्याचे व्यवस्थापन |
| ८) | वनीकरण | :- शहरातील वनीकरण वातावरणातील प्रदुषण थांबविणे. |
| ९) | सामाजिक समता | :- समाजातील दुर्बल घटकांचे (अपंग व मतिमंद)यांच्या हक्कांचे संरक्षण |
| १०) | झोपडपट्टी | :- झोपडपट्टी पुर्नवसन |
| ११) | दारिद्रय | :- दारिद्र्य निर्मुलन |
| १२) | सार्वजनिक सुविधा | :- बागबगीचे, खेळाची मैदाने |
| १३) | सांस्कृतिक व शैक्षणिक सुविधा | :- सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन |
| १४) | स्मशानभुमी व दफनभुमी | :- दफनभुमी, स्मशाने, स्मशानभुमी, विद्युतवाहिनी |

१५) गुरेढोरे :- गायरान, गुरांसाठी पाण्याची व्यवस्था व भुतदया
१६) लोकसंख्या :- जन्म मृत्यु नोंदणी
१७) रचनात्मक सुविधा :- रस्त्यावरील दिवे, वाहन पार्किंग व्यवस्था, बसस्टॉप इ.
१८) कत्तलखाना :- कत्तलखाना व चामडी कमावण्याच्या उद्योगाची नियमावली.

परंतु यातील सर्व कर्तव्ये सर्वासाठी बंधनकारक न करता त्यामधील कोणत्या जबाबदाऱ्या महानगरपालिकेस / नगरपालिकेस द्यावे यांचे अधिकार राज्य शासनाकडे सोपविण्यात आले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मध्ये काही दुरुस्त्या करण्यात आल्या सदर दुरुस्तीमध्ये कलम ६७- अ चा समावेश करण्यात आला. सदर ६७- अ प्रमाणे मा. महानगरपालिका आयुक्त यांना प्रतिवर्षी ३१ जुलै पर्यंत पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा. महापालिका सभेपुढे सादर करण्यास बंधनकारक करणेत आले परंतु सदर अहवाल तयार करण्याकरिता मार्गदर्शन केले नव्हते. प्रत्येक महानगरपालिकेने आपल्या पध्दतीप्रमाणे पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणेस सुरुवात केली . त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १९९६ - १९९७ साली सुरुवात केली आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाने आदेश दिला आहे. शासनाचे पत्र क्र. परिपत्रक क्र.जीईएन-१०९७/१८३७/प्र.क.२२४/९७/नवि-२४, दिनांक - ९.११.१९९८ नुसार पर्यावरण सद्यस्थिती दर्शक अहवाल तयार करताना खालील बाबींचा समावेश करावा असे सुचविले आहे.

१) पाणीपुरवठा, सांडपाणी जमा करण्याची यंत्रणा
२) सांडपाणी प्रक्रिया व नि:सारण
३) घनकचरा जमा करणे आणि त्याची विल्हेवाट
४) पाण्याची तळी, विहिरी इ.
५) वृक्षांची संख्या व त्यांचे वर्गीकरण
६) पाणी, हवा, वायु प्रदुषण आणि त्यांचे पृथ:करण

पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सादर करताना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील माहिती व काही संस्थांना पर्यावरण संदर्भात पृथ:करणाची कामे देवुन अहवालातुन प्राप्त झालेल्या माहितीचा समावेश या अहवालात करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रदुषणासाठी कंपन्या व संस्थांवर केलेल्या कारवाईची माहिती या अहवालात समाविष्ठ केलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या विविध विभागांकडुन आवश्यकतेनुसार मासिक व वार्षिक माहिती पर्यावरण अहवालासाठी घेण्यात आलेली आहे. पर्यावरण अहवालामध्ये सुचविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी बहुतांश शासकीय, निमशासकीय संस्था अंदाजपत्रकीय तरतुदी करतात. अशा रितीने सन २००७-२००८ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेत येत आहे.